प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी**, पहिला माळा, बी विंग
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१
दुरध्वनी क्रं. ०७१२-२५५६९१६

महाराष्ट्र वन विभाग

क्रं. कक्ष-१७/FCA-S1/PID-९५२७४७/पुणे/१८८६ दिनांक:- २५/९/२०२३

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
पुणे

विषय :- वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत पुणे महानगरपालिका, पुणे यांना पाषाण ते एनडीए या अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी मौजे बावधन, ता.मुळशी, जि.पुणे येथील ०.४५ हे. राखीव वन जमीन वळतीकरणाबाबत.

संदर्भ:- महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील पत्र क्र.एफएलडी-१९२३/प्र.क्र.२७८/फ-१० दि.२२/९/२०२३.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये विषयांकीत प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने ३ मुद्यांवर माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत (प्रत संलग्न). करीता प्रकरणी त्रुटी पुर्तता अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा जेणेकरुन शासनास अहवाल सादर करता येईल.

सहपत्र-वरीलप्रमाणे

25/9/23

(नरेश झुरमुरे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी

प्रतिलिपी :- उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग
प्रतिलिपी :- मुख्य अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे.

महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र. एफएलडी-१९२३/ प्र.क्र. २७८/ फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २२.०९.२०२३

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषयः- वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत पुणे महानगरपालिका, पुणे यांना पाषाण ते एनडीए या अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदी करणासाठी मौजे बावधन, ता. मुळशी, जि. पुणे यथील ०.४५ हे. राखीव वन जमीन वळतीकरणाबाबत..

संदर्भः- आपले पत्र क्र. डेस्क १७/FCA-S१/PID १५२७४७/१३९३/पुणे, दि.०३/०८/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपल्या संदर्भाधीन पत्रान्वये शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील नमुद मुद्यांबाबत अधीकची माहिती शासनास त्वरीत सादर करण्यात यावी, ही विनंती.

१) सदर प्रकरणी पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावीत करण्यात आलेल्या मौजे भरे, ता. मुळशी, जि. पुणे येथील गट नं. ४०६, मधील ०.५० हे. अवनत वनजमिनिचा गा. न. नं.७/१२ सादर करण्यात यावा.

२) सदर प्रकल्पास पुणे महानगरपालिकेची प्रशासकीय व तांत्रीक मान्यता प्राप्त झाल्याचे आदेश सदर प्रस्तावामध्ये आढळून येत नाहीत. त्यामुळे सदरचे आदेश सादर करण्यात यावेत.

३) प्रस्तावासोबतच्या KML File अवलोकन केले असता, वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्रामध्ये बांधकाम असल्याचे दिसते. परंतु, सदरचे बांधकाम वन विभागाचे/पुणे महानगर पालिकेचे /अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण आहे, याबाबत स्पष्टता होत नाही. यामध्ये काही रस्त्याचे व इमारतीचे बांधकाम यापूर्वीच झाल्याचे दिसून येते.

सबब, सदरचे बांधकाम वन विभागाचे असल्यास सदर बांधकामाची भरपाई प्रकल्प यंत्रणेकडून वसूल करणे आवश्यक आहे किंवा कसे व सदर बांधकाम अनधिकृत असल्यास त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करणे तसेच पुणे मनपाकडून वनभंग झाला आहे किंवा कसे, यासंदर्भात खुलासा करण्यात यावा.

उपरोक्त नमुद मुद्यांची माहिती शासनास त्वरीत सादर करण्यात यावी, ही विनंती.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव :

मुख्य अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे.

Scanned with CamScanner